SHRIMATI BINZANI MAHILA MAHAVIDYALAYA
MAHAL, NAGPUR
NAAC Re-Accredited B Grade

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय, नागपूर

६२ वा वर्धापन दिवस व 'दीपकळी' वार्षिकांक प्रकाशन सोहळा

श्रीमती बिंझाणी महिला महाविद्यालय नागपूर येथे दिनांक २६ जुलै २०२४ रोजी ६२ महाविद्यालयाचा ६२ वा वर्धापन दिन व 'दीपकळी' वार्षिकांकाचे प्रकाशन या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून नागपूर शिक्षण मंडळाचे अध्यक्ष श्री मोहित शाह, ना शिक्षण मंडळाचे सचिव डॉ. हरीश राठी, प्रमुख अतिथी प्रेरणा कॉलेज ऑफ कॉमर्सचे संचालक डॉ. प्रविण जोशी, विशेष आमंत्रित अतिथी डॉ. राजकन्या सिद्धिकी, प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार, वार्षिकांकाच्या प्रभारी डॉ. अपर्णा चौधरी आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व विद्यार्थिनींच्या शारदास्तवनाने झाली. प्राचार्य डॉ. उज्वल लांजेवार यांनी आपल्या प्रास्ताविकातून महाविद्यालयाचा गौरवशाली इतिहास उलगडून दाखवत 'दीपकळी' वार्षिकांकाची पार्श्वभूमी स्पष्ट केली. वार्षिकांकाच्या प्रभारी प्राध्यापक डॉ. अपर्णा चौधरी यांनी ६२ व्या दीपकळी वार्षिकांकाबाबत आपले मनोगत व्यक्त केले. अतिथींच्या स्वागतानंतर 'दीपकळी' वार्षिकांकाचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी डॉ. प्रविण जोशी यांचा परिचय प्रभारी डॉ. सुचिता वराडे यांनी करून दिला. प्रमुख अतिथी

डॉ. प्रविण जोशी यांनी आपल्या वक्तव्यातुन दीपकळी वार्षिकांकातील विविध लेखाविषयी आपले विचार व्यक्त करीत शुभेच्छा दिल्यात. विशेष आमंत्रित डॉ. राज सिद्दिकी यांनी महाविद्यालयाच्या समृद्ध वाटचालीचा गौरव करीत शुभकामना दिल्यात. अध्यक्षीय भाषणातुन डॉ. मोहित शाह यांनी शिक्षणातील स्थित्यंतर व गती यावर प्रकाश टाकीत महाविद्यालयाच्या शिक्षकवृंदाबद्दल गौरवोद्गार व्यक्त केलेत. वार्षिकांकात समाविष्ट असलेल्या सर्वोत्कृष्ट लेखांना पारितोषिक देऊन पुरस्कृत करण्यात आले. ~~स्वाव~~ मनिषा धानके, निर्मला ढवे, सुपर्णा मिश्रा, श्रेया सालोडकर, वैष्णवी कुंभलवार यांना पारितोषिक व प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख अतिथी डॉ. प्रवीण जोशी यांनी ई-वार्षिकांकाचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. चारुता जोशी यांनी तर आभारप्रदर्शन प्रा. रूपा व्यास यांनी केले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुचित्रा मराठे, पर्यवेक्षिका प्रा. आरती बरगे, समस्त प्राध्यापकवृंद व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.